## लाचखोर ग्रामसेवकासह रोजगार सेवक अँटी करप्शनच्या जाळ्यात

**पाचोरा । प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या मांडकी ता भडगाव येथील घरकुल लाभार्थी कडून घरकुल योजनेचा दुसरा हप्ता आणि नमुना नंबर आठ मिळवण्यासाठी पाच हजार रुपयेची लाच स्वीकारताना एका ग्रामसेवकासह दोघांना जळगांव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २३ जून रोजी रंगेहाथ पकडले असुन या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

भडगाव तालुक्यातील मांडकी येथील ग्रामसेवक सोनिराम धनराज शिरसाठ (वय ४७, रा. पाचोरा) आणि रोजगार सेवक जितेंद्र लक्ष्मण चौधरी (वय ३८, रा. मांडकी) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ५००० रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. घरकुल योजनेच्या दुसऱ्या हप्त्यासाठी आणि गट नंबर नमुना आठ मिळवण्यासाठी त्यांनी तक्रारदाराकडे ६००० रुपयांची मागणी केली होती. तडजोडीअंती ५००० रुपये स्वीकारताना त्यांना सापळा कारवाईद्वारे ताब्यात घेण्यात आले. एसीबी जळगाव यांना २३ जून २०२५ रोजी मांडकी येथील एका ३५ वर्षीय व्यक्तिकडून तक्रार मिळाली होती की, ग्रामसेवक आणि रोजगार सेवक त्यांच्या मंजूर घरकुल योजनेच्या दुसऱ्या हप्त्यासाठी आणि गट नंबर नमुना आठ देण्यासाठी ६००० रुपयांची लाच मागत आहेत. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीने पाचोरा येथे सापळा रचला. पंचांसमक्ष तडजोडीअंती ५००० रुपये लाच स्वीकारताना दोघांना रंगेहाथ पकडण्यात आले. हस्तगत रक्कम ५००० रुपये जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक योगेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी तथा पोलीस निरीक्षक नेहा सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक नेत्रा जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश सिंग पाटील, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विलास पाटील, हेमंत पाटील तसेच सुभाष पावरा यांच्या पथकाने यशस्वी पणे पार पाडली.

## खानदेश शिक्षण मंडळ संस्थेला M.C.A.च्या अभ्यासक्रमाची मान्यता

**अमळनेर । प्रतिनिधी**

येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेला AICTE, न्यु दिल्ली यांनी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून M.C.A. (Master of Computer -pplication) अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली आहे. प्रताप महाविद्यालयात B.B.A./B.C.A. चा अभ्यासक्रम २००९- १० या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आला आहे. M.C.A. चा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी खानदेश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ.संदेश बिपीन गुजराथी, कार्योपाध्यक्ष सीए निरज दिपचंद अग्रवाल, संचालक प्रदिप कुंनदलाल अग्रवाल, हरी भिका वाणी, कल्याण साहेबराव पाटील, विनोद राजधर पाटील, अनिल नथ्थु शिंदे, योगेश मधुसूदन मुंदडे, चिटणीस प्रा.पराग पी.पाटील, प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण बी.जैन यांच्या मार्गदर्शनात प्रा.डॉ.किरण सुर्यवंशी, प्रा.रोहन गायकवाड, कुलसचिव राकेश निळे, मुख्य लिपीक भटू चौधरी यांनी पाठपुरावा केला. M.C.A. चा अभ्यासक्रमास मान्यता मिळाल्याबद्दल खानदेश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र झाबक,उपाध्यक्ष माधुरी पाटील, उपाध्यक्ष जितेंद्र देशमुख, विश्वस्त वसुंधरा लांडगे यांनी अभिनंदन केले.

## जळोद येथे गळफास घेऊन इसमाची आत्महत्या



**अमळनेर । प्रतिनिधी–** तालुक्यातील जळोद येथील दिलीप उत्तम ठाकरे (चौधरी) वय ५४ याने तुळशीराम हिलाल पाटील यांच्या शेतात निंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २३ रोजी सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास घडली. याबाबत अमळनेर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून तपास पोलीस उपनिरीक्षक भगवान शिरसाठ करीत आहेत.

## निंभोरा-जळगाव मुक्कामी बस बंदमुळे गैरसोय

**निंभोरा बु., ता.रावेर । वार्ताहर**

येथे मुक्कामी असलेली सकाळी पाच वाजेला जळगावला जाणारी बस कोरोना काळापासून बंद केल्याने निंभोरा येथील प्रवाशांची गैरसोय होत आहे.पंचक्रोशीतील तालुक्यातील मोठे गाव असून देखील याकडे दुर्लक्ष होत आहे. एसटी बस आगाराने व रेल्वे प्रशासनाने दादर अमृतसर एक्सप्रेस बंद केल्याने दुहेरी गैरसोयीच्या कोंडीत अडकवले आहे कोरोनाकाळा पूर्वी सकाळी ७ ला असलेली पॅसेंजर गाडी रात्री २.३० वाजता झाल्याने ती देखील मोठी गैरसोय झाली आहे. आरोग्यविषयक अडचणी, तसेच शाळकरी मुले, चाकरमान्यांची जळगाव या जिल्ह्याच्या ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे तरी रावेर आगाराने या संदर्भात सकाळी ५ ला मुक्कामी बस नसल्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहे. प्रवाशांची मागणी लक्षात घेता ही बस लोकप्रतिनिधींनी लक्ष देत पुन्हा पूर्ववत सुरू करावी अशी मागणी होत आहे.

## मिसाबंदीच्या काळातील कारावास भोगलेल्या...

# साकळी येथील संघ स्वयंसेवकांच्या आठवणी ५० वर्षांनंतर आजही जिवंत!

**साकळी, ता.यावल । चंद्रकांत नेवे**

### गावाला राष्ट्रभक्तीचे वलय, आठ स्वयंसेवकांनी भोगला होता कारावास



केंद्रातील तात्कालीन काँग्रेस प्रणित सरकारने दि.२५ जून १९७५ ला देशात आणीबाणी लावून संपूर्ण देशातील सरकारविरोधी विचारांच्या लोकांना मिसाबंदीच्या कायद्याखाली बंदीवासात ठेवलेल्या मध्ये जळगाव जिल्ह्यासह यावल तालुक्यातील अनेक संघ स्वयंसेवकांना अटक करण्यात आलेली होती. यात साकळी ता.यावल येथील तब्बल आठ स्वयंसेवकांची धरपकड करून त्यांना अटक करण्यात आली होती. ही संख्या यावल तालुक्यातील सर्वाधिक होती. सर्व स्वयंसेवकांसाठी तो काळ अतिशय कठीण व दडपशाहिचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारा होता. या सर्व आठवणींचे काही साक्षीदार गावात आजही हयात आहे. दरम्यान काळाने आपली पुढे पुढे धाव घेत आज दि.२५ जून २०२५ रोजी या सर्व इतिहास झालेल्या काळाला तब्बल पन्नास वर्षाचा काळ लोटला गेलेला आहे. तरीही त्या काळातील आठवणी मिसाबंदीतील कारावास भोगलेल्या स्वयंसेवकांच्या हृदयाचा जिवंत आहे. हे विशेष आहे.

साकळी गाव फार पूर्वीपासून हिंदुत्वाचे व राष्ट्रीय विचारसरणीचे व हिंदू घराघरात संघ स्वयंसेवक असणारे गाव आहे.संघ स्थापनेपासूनच हिंदुत्वाच्या व देशभक्तीच्या विचारसरणीने प्रभावित झालेले अनेक ज्येष्ठ- श्रेष्ठ संघाचे स्वयंसेवक गावात होऊन गेलेले असून नविन स्वयंसेवक घडण्याची परंपरा निरंतर सुरू आहे.संघ शाखा हे जीवनाचे अंतिम सत्य मानणाऱ्या गावातील काही जेष्ठ-श्रेष्ठ स्वयंसेवकांनी आपल्या संसार प्रपंचावर 'तुळशीपत्र' ठेऊन संघकार्यासाठी जीवन समर्पित केलेले आहे. दरम्यान राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पन्नाशीत असतांना देशात काँग्रेस प्रणित सरकारने देशात आणीबाणी लागू करत आणीबाणी विरोधातील अनेकांना अटक केली.

या दरम्यान संघाच्या कार्यकर्त्यांच्या धरपकडित साकळी ता.यावल येथील स्व.शांताराम (बापू) नानाजी नेवे, स्व.डॉ.गोकुळ उखर्डू नेवे, स्व.अरुण राजाराम नेवे, स्व.बुधो तुकाराम तायडे, धोंडू (अण्णा) देवचंद माळी, वसंत खुपचंद बडगुजर, प्रताप लक्ष्मण बडगुजर, रामकृष्ण पुरुषोत्तम नेवे या तब्बल आठ स्वयंसेवकांना क्रमाक्रमाने अटक केली.सर्व स्वयंसेवक ऐन तारुण्यात व उमेदीच्या उंबरठ्यावर होते. कोणाचा नवीन संसार होता,कुणाचे लहान लहान मुले-बाळे होती, कुणाच्या खांद्यावर कुटुंबाची जबाबदारी होती, कोणी घरातील कर्ता पुरुष होता.अश्या अशा परिस्थितीत कायद्याच्या पालनकर्त्यांनी या स्वयंसेवकांना जसे जमेल तशी अटक केली. सर्वांना एका ठिकाणी न ठेवता वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यात आले. कोणी दहा महिने, कोणी बारा महिने तर कोणी दीड-दोन वर्षाच्या कालावधीसाठी अटकेत राहिले.घरातील कर्त्या माणसाला अटक केल्यानंतर आमच्या पश्चात घराची अवस्था काय असेल? आर्थिक उत्पन्नाचे कोणतेच स्रोत नसतांना कुटुंबाने कसे दिवस काढले असतील? कोणी मदत केली? या आठवणी सांगताना या स्वयंसेवकांना आजही डोळे पाणावतात, अंगावर काटा उभा राहतो, मन हेलावून जाते.

या काळात या सर्वच स्वयंसेवकांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत दिवस काढले. सध्याच्या घडीला या आठ स्वयंसेवकांपैकी चार स्वयंसेवक मयत झालेले असून सध्या चार हयात आहे. हयात असलेले चार स्वयंसेवकांनी ८० च्या दरम्यान वयोमान गाठलेले असून आयुष्याचे शेवटचे पर्व आपल्या कुटुंबाच्या आधाराने जगत आहे. त्यांना शासनाचे जिवन जगण्यापुरता मानधनही सुरू आहे. मात्र आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात दुर्धर आजार व इतरही शारीरिक व्याधींनी या स्वयंसेवकांचे सध्याचे आरोग्य काळजीचे बनले आहे.सोबत त्यांच्या पत्नीचे हे वृद्धपण आहे.ही सर्व परिस्थिती पाहता मिसाबंदीच्या स्वयंसेवकांसाठी आरोग्याबाबत शासन स्तरावरून योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. जेणे करून या स्वयंसेवकांचे जगणे सुसह्य बनेल अशी अपेक्षा आहे.

आणीबाणीच्या काळाला आज दि.२५ जून २०२५ रोजी पन्नास वर्ष झाली. मात्र मिसाबंदीच्या कायद्यांतर्गत काही एक कारण नसताना विनाकारण शिक्षा झालेल्या या स्वयंसेवकांच्या मनामध्ये आजही प्रखर राष्ट्रभक्तीची व हिंदुत्वाची विचारधारा धगधगत असल्याचे नेहमीच जाणवत असते.विचारातून प्रेरणा मिळत असते.या सर्व स्वयंसेवकांच्या मिसाबंदीच्या अटकेच्या प्रसंगांच्या आठवणीतून नवीन स्वयंसेवकांना कायमच राष्ट्रभक्तीची प्रेरणा मिळत राहील हे मात्र अटळ सत्य असून हेच मिसाबंदीच्या पन्नाशीच फलीत असेल.

## साठवण तलाव पद्मालय-२ उपसा सिंचन योजना प्रकल्पाला १०७२.४५ कोटी किमतीच्या द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मंजुरी

**एरंडोल । प्रतिनिधी**

एरंडोल विधानसभा मतदारसंघातील मोठे प्रकल्प पूर्ण होवून शेतीला मुबलक पाणी उपलब्ध होणेसाठी जास्तीत जास्त शेत जमीन ओलिताखाली यावी, शहरी भागासह ग्रामीण भागातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायम मार्गी लागावा यासह पाणी प्रश्न हा कायमचा दूर व्हावा, यासाठी मा.आमदार मा.आबासाहेब चिमणराव पाटील हे सातत्याने प्रयत्न करीत होते. त्याच अनुषंगाने विद्यमान आमदार मा.अमोल पाटील हे देखील त्याच दूरदृष्टीने मतदारसंघात जोमाने कार्य करीत आहेत. गेल्या काळांत भामरखेडा ल.पा.प्रकल्प, अंजनी मध्यम प्रकल्प यांसह अन्य प्रकल्पे आज देखील सुरु आहेत व लवकरच हि कामे पूर्ण होणार आहेत.

साठवण तलाव पद्मालय-२ उपसा सिंचन योजना, एरंडोल जि.जळगाव हा मध्यम प्रकल्प तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगावअंतर्गत तापी खोऱ्यातील गिरणा उपखोऱ्यात एरंडोल तालुक्यातील पद्मालय गावाजवळ आहे. प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा ७०.३६ द.ल.घ.मी. इतका असून उपयुक्त पाणीसाठा ६५.५३ द.ल.घ.मी. इतका आहे. एरंडोल व धरणगाव तालुक्यातील ३३ गावातील ९००० हेक्टर क्षेत्र सिंचीत करणेचे प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत माती धरणाचे ९० टक्के काम पूर्ण झालेले असून उपसा प्रणालीची व वितरण प्रणालीची सर्व कामे बाकी आहे. हि कामे पूर्ण होवून मतदारसंघातील जास्तीत जास्त क्षेत्र हे ओलिताखाली यावे यासाठी आमदार अमोल पाटील हे सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करीत होते. या प्रयत्नांना अखेर यश आले असून साठवण तलाव पद्मालय-२ उपसा सिंचन योजना, एरंडोल जि.जळगाव या प्रकल्पाचा रुपये १०७२.४५ कोटी किंमतीच्या द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास दि.२३ जून २०२५ रोजी झालेल्या व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे काम सुरू होऊन दोन वर्षात पूर्ण होणार आहे. या प्रकल्पाचा मंजुरीमुळे सिंचनासह पिण्याचा पाण्याचा देखील प्रश्न मिटणार असल्याने आ.अमोल पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे आभार मानले आहेत.



## जुनवणे रामेश्वर पळासदळे रस्त्याची दुरवस्था

**अमळनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील जुनवणे रामेश्वर पळासदळे या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहन चालकांना त्रास सहन करावा लागत आहे. जुनवणे रामेश्वर पळासदळे हा रस्ता २०१० मध्ये पंतप्रधान सडक योजनेतून झाला होता. आता रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहचालकांना मणक्याचे विकार होत असून वाहनांचे देखील नुकसान होत आहे. निवडणुकीच्या आधी रस्ता मंजूर झाला, टेंडर झाले असे सांगण्यात आले होते मात्र निवडणूक होऊन एक वर्ष उलटले तरी रस्ता होत नाही. त्याचप्रमाणे सारबेटे रामेश्वर रस्ता देखील अतिशय खराब झाला असून त्यावरून देखील वाहने जाऊ शकत नाही. तरी दोन्ही रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी पंचायत समितीचे माजी सभापती भोजमल पाटील यांनी केली आहे.

## स्व.मधुकरराव चौधरी जयंती साजरी

**खिरोदा, ता.रावेर । वार्ताहर**



धनाजी नाना विद्यालयात नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहाने करण्यात आली. सुरुवातीला मुख्याध्यापिका सौ.मनिषा महाजन यांच्या हस्ते माजी संस्थाध्यक्ष स्व.लोकसेवक मधुकरराव चौधरी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले. मधुकरराव चौधरी यांच्या जीवन व कार्याची माहिती सौ.हेमलता चौधरी यांनी दिली. नवीन ५ वीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत बँडपथकाने मिरवूक काढून गुलाबपुष्प व औक्षण करुन करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ.मनिषा महाजन यांनी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. शासनाने सर्व शिक्षा अभियानअंतर्गत पुरविलेले मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप इ.५ वी ते ८ वी. विद्यार्थ्यांना करण्यात आले. तसेच गरीब, होतकरु विद्यार्थ्यांना शाळेमार्फत वह्या, दप्तरांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक एस.पी.चौधरी, शिक्षक आदी उपस्थित होते.

## कन्नड घाटात लवकरच २६ कोटींच्या खर्चातून १२.७५ किमीचा बोगदा होणार

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या बैठकीत सकारात्मकता

**चाळीसगाव । प्रतिनिधी**



कन्नड (औट्रम) घाटात संयुक्तपणे रस्ता व रेल्वे बोगदा करण्याविषयी चर्चा झाली होती मात्र त्यासाठीचा खर्च हा खूप जास्त होत असल्याने पहिला टप्प्यात राष्ट्रीय महामार्गावरील १२.७५ किमी रस्त्याचा बोगदा+व्हायाडक्ट करण्याचे निश्चित केले असून जवळपास २६०० कोटींच्या या प्रकल्पाचे काम लवकरच सुरू होईल असे केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीनजी गडकरी यांनी आश्वस्त केले आहे.

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ वरील कन्नड (औट्रम) घाटातील बोगद्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून याबाबत असलेला संभ्रम दूर व्हावा व लवकरात लवकर कार्यवाही होऊन केवळ चाळीसगावचं नव्हे तर खान्देश व मराठवाड्याच्या विकासातील एक महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागावा. यासाठी आज नागपूर येथे केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीनजी गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची जलसंपदा मंत्री गिरीषभाऊ महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत भेट घेतली व या महत्वाच्या मुद्द्याकडे लक्ष वेधले. यावेळी श्री.नितीनजी गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व रेल्वे मंत्रालय यासोबत बैठक होऊन कन्नड (औट्रम) घाटात संयुक्तपणे रस्ता व रेल्वे बोगदा करण्याविषयी चर्चा झाली होती मात्र त्यासाठीचा खर्च हा खूप जास्त होत असल्याने पहिला टप्प्यात राष्ट्रीय महामार्गावरील १२.७५ किमी रस्त्याचा बोगदा+व्हायाडक्ट करण्याचे निश्चित केले असून जवळपास २६०० कोटींच्या या प्रकल्पाचे काम लवकरच सुरू होईल असे आश्वस्त केले.

> एक रस्तेबांधणीसाठी बोगदा आणि दुसरा बोगद्याच्या दोन्ही टोकांवर व्हायाडक्टसाठी. सध्या सदर प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग विभागाकडे प्रलंबित आहे. लवकरच त्याला मान्यता मिळून हा प्रकल्प मार्गी लागेल हा आम्हाला विश्वास आहे. या बोगद्यांची एकूण लांबी: १२.७५ किमी (बोगद+व्हायाडक्ट), एकूण खर्च २६०० कोटी (सुधारित अंदाज) यामध्ये २ टप्पे असतील.
>
> **-आ.मंगेश रमेश चव्हाण**

या बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, खा.सौ.स्मिताताई वाघ, आ.सौ.देवयानी फरांदे, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ व सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

औट्रम घाट व परिसरातील रस्त्याची अत्यंत खराब अवस्था, वारंवार दरडी कोसळणे, पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात भेगा पडणे, वारंवार होणारी वाहतूक कोंडी व अपघाताचे प्रमाण वाढणे या प्रश्नासंदर्भात कायमचा तोडगा काढण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. दि.४ ऑगस्ट २०२३ रोजी मा.उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश देऊन सर्व व्यावसायिक वाहनांची (डिझेल/एलपीजी/मल्टी ॲक्सल ट्रक, दूध वाहतूक, कंटेनर, लक्झरी बसेस) वाहतूक ऑट्रम घाटातून बंद केली. त्याऐवजी दौलताबाद टी पॉइंट-देवगाव-वाकळा-पिंपरखेड-न्यायडोंगरी मार्गे चाळीसगाव मार्ग वापरण्याचे आदेश दिले आहेत. नंतर दि.२७ फेब्रुवारी २०२४ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मा. सेवानिवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली. या समितीच्या कार्यमंडळास घाटातील पर्यायी मार्ग आणि संभाव्य बोगदा प्रकल्प यावर सखोल अभ्यास करून शिफारसी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. दिनांक १३/०३/२०२४ रोजी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तर्फे समितीसमोर सादर करण्यात आला. हा अहवाल छक-५२ वरील किमी ३७५ ते ३९० (एकूण १५ किमी) विभागासाठी होता. अहवालात एकूण ४ पर्यायांचा विचार करण्यात आलेला होता. दि.१० जुलै २०२४ रोजी केंदीय मंत्री (रस्ते व वाहतूक) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, वन्यजीव कॉरिडॉरच्या संवेदनशीलतेमुळे बोगदा आणि व्हायाडक्ट असलेला पर्याय अधिक सुरक्षित व अनुकूल असल्याचे नमूद करण्यात आले, त्यानुसार बोढरे (चाळीसगाव) ते तेलवाडी दरम्यान एकूण १२.७५ किमी च्या ४ पदरी रस्तासंदर्भात संबंधित बोगद्याचे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले.

चतुर्थ पुण्यतिथि



स्व.श्री.दादासाहेब बळीराम तोताराम सोनवणे
(जन्म: 10 डिसेंबर 1937) (स्वर्गवास: 25 जून 2021)

स्वाभिमानाने जगलात तुम्ही, चंदनासारखे झिजलात तुम्ही,
सर्वत्र सुगंध पसरविलात तुम्ही, तुमच्या आठवणीत जगत आहोत आम्ही..

माजी जि.प. सभापती-समाज कल्याण विभाग, जळगाव
माजी सभापती, बाजार समिती, जळगाव
राजकारण, सहकार व समाजसेवेतील मातब्बर व्यक्तिमत्व,
कुस्ती, कबड्डी, आणि व्हॉली बॉल चॅम्पियन असणारे,
स्व.श्री.दादासाहेब बळीराम तोताराम सोनवणे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन..!

::: श्रद्धानवत :::

गं.भा.सुमनबाई बळीराम सोनवणे (पत्नी)

आ.प्रा. चंद्रकांत बळीराम सोनवणे (मुलगा)
मा.आ.सौ. लता चंद्रकांत सोनवणे (सून)
नरेश बळीराम सोनवणे (मुलगा)
सौ. अनिता नरेश सोनवणे (सून)
डॉ. गौरव चंद्रकांत सोनवणे (नातू)
डॉ. अमृता शंतनु सोनवणे (भारद्वाज) (नात)
डॉ. शंतनु हरी भारद्वाज (नात-जावाई)
इंजि. सागर श्यामकांत सोनवणे (नातू)
इंजि. यामिनी श्यामकांत सोनवणे (नात)

श्यामकांत बळीराम सोनवणे (मुलगा)
सौ. राखी श्यामकांत सोनवणे (सून)
डॉ. किरण बळीराम सोनवणे (मुलगा)
सौ. रूपाली किरण सोनवणे (सून)
डॉ. कोमल नरेश सोनवणे (नात)
डॉ. दर्शना नरेश सोनवणे (नात)
कु. आर्यन नरेश सोनवणे (नातू)
कु. किंजल किरण सोनवणे (नात)
कु. मानस किरण सोनवणे (नातू)

समस्त सोनवणे परिवार व मित्र परिवार, चोपडा - जळगाव